# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना राबविताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास

**डॉ.पुष्कर सुनील गांधी**
सहाय्यक प्राध्यापक
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,बार्शी

**सारांश-**

*NEP 2020 मध्ये शिक्षणाचा दृष्टिकोन समाजसेवा, व्यावहारिक अनुभव आणि कौशल्य-आधारित शिक्षण यावर केंद्रित आहे. NSS ही या धोरणाची महत्त्वाची कडी असली तरी, तिच्या अंमलबजावणीत येणाऱ्या प्रशासकीय, आर्थिक आणि तांत्रिक अडचणी दूर केल्या पाहिजेत. जर NSS ला NEP च्या दृष्टीने पुनर्गठित केले गेले, तर ती विद्यार्थी आणि समाज या दोघांनाही फायदा देऊ शकेल.*

***"सेवा हाच खरा धर्म" या संकल्पनेला NEP 2020 च्या माध्यमातून साकारण्यासाठी NSS ची भूमिका महत्त्वाची आहे.***

***मुख्य शब्द*** *- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी*

**प्रास्ताविक -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (**National Education Policy - NEP**) 2020 हे भारत सरकारने शिक्षणक्षेत्रात आणलेले एक क्रांतिकारी धोरण आहे. 34 वर्षांनंतर (1986 नंतर) शिक्षण धोरणात मोठा बदल करण्यात आला आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये सर्वांगीण बदल घडवून आणणे आणि भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हा आहे.सर्वांसाठी शिक्षणाची समुपलब्धता (Gross Enrollment Ratio 2035 पर्यंत 50% वर नेणे), शिक्षणात गुणवत्ता आणि नाविन्यता आणणे,भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे समन्वय,रोजगारक्षमता वाढविणे, उद्योजकता विकसित करणे, शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर,शोध आणि नाविन्यावर भर ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना (**National Service Scheme - NSS**) ही भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाची एक महत्त्वाची योजना आहे. १९६९ मध्ये सुरू झालेल्या या योजनेचे मुख्य ध्येय "विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव व समुदायसेवेची भावना विकसित करणे" हे आहे.विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे,समुदायासोबत काम करून व्यावहारिक अनुभव देणे,राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढवणे ही राष्ट्रीय सेवा योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. स्वच्छता अभियान,रक्तदान शिबिर, पर्यावरण संवर्धन,साक्षरता अभियान,आरोग्य जागरूकता कार्यक्रम, विशेष श्रम संस्कार शिबीर इत्यादी उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनामध्ये राबविले जातात. महात्मा गांधींच्या शिक्षण तत्त्वज्ञानावर आधारित, "नई तालीम" च्या संकल्पनेतून प्रेरणा यावर रासेयो आधारित आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राष्ट्रीय शैक्षणिक योजना या दोन्हींची सांगड घालताना ज्या अडचणी येतात त्याचा अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे. तसेच अडचणी दूर करण्यासाठी शिफारशी सुचविले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा समजून घेणे
२) राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम राबविताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे
३) अडचणी दूर करण्यासाठी शिफारसी सुचविणे

**संशोधनाची गरज –**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 रोजी जाहीर झाले तरी 2023 पासून ते लागू करण्यास सुरुवात झाली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील स्वायत्त महाविद्यालयात 2023 -24 तर इतर महाविद्यालयात 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. विषय, विभाग, शिक्षकांचा कार्यभार, वेळेचे नियोजन या सर्वांचा ताळमेळ करून विद्यापीठीय शैक्षणिक आराखडा तयार

करण्यात आला. बीए शैक्षणिक आराखड्यामध्ये बीए भाग प्रथम वर्ष द्वितीय, सत्रास बीए भाग द्वितीय वर्ष तृतीय सत्रास राष्ट्रीय सेवा योजना अनुक्रमे दोन क्रेडिट साठी लागू करण्यात आला आहे आहे. प्रथम वर्षातील द्वितीय सत्रात हा जरी उपक्रम असला तरी याची निवड प्रवेश घेतानाच करावी लागते. विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना प्रत्यक्षात राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय? याची जाणीव नसते. राष्ट्रीय सेवा योजनेसोबत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्रसेना, सांस्कृतिक कार्यक्रम, योगशिक्षण, खेळ असे इतर पर्याय उपलब्ध आहेत. अभ्यासपूरक उपक्रमाची निवड करताना विद्यार्थ्यांना या संदर्भात योग्य मार्गदर्शन मिळत नाही. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम राबवताना असंख्य अडचणी येतात. या अडचणी कोणत्या? या अडचणी कशा दूर करता येतील? याचा अभ्यास करण्यासाठी या संशोधनाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती-**

१) प्रश्नावली २) मुलाखत ३) निरीक्षण

**नमुना निवड –**

सदर संशोधनासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठातील १०० विद्यार्थ्यांची व २५प्राध्यापकांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आली आहे.

**संशोधन व्याप्ती व मर्यादा -**

सदर संशोधानासाठी केवळ BA./B.SC/B.COM अभ्यासक्रमाचा विचार करण्यात आला आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाचा विचार करण्यात आला नाही. हे संशोधन केवळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठापुरतेच मर्यादित आहे. हे संशोधन केवळ राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमापुरतेच मर्यादित आहे.२०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा यामध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

**निष्कर्ष –**

**१)विद्यार्थ्यांचा कमी सहभाग-**

NEP-2020 अंतर्गत विषयांची संख्या वाढली आहे. प्रवेश प्रक्रिया, अध्यापन व सत्र परीक्षा यामुळे अभ्यासासाठी कमी कालावधी मिळतो.याकारणामुळे विद्यार्थांचा रासेयो कडे कमी सहभाग असतो.

**२)शैक्षणिक दबावामुळे वेळेची कमतरता-**

प्रवेश प्रक्रिया, अध्यापन व सत्र परीक्षा यामुळे रासेयो कार्यक्रम राबविण्यासाठी कमी कालावधी उपलबद्ध होतो.कार्यक्रमंची संख्या अधिक असल्यामुळे दिवस कमी पडतात.सुट्टीच्या दिवशी येण्याची प्राध्यापक व विद्यार्थांची मानसिकता नसते.

**३)कमी क्रेडीट-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेसाठी प्रथम वर्षाला दोन क्रेडिट तर द्वितीय वर्षाला दोन क्रेडिट देण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची एकूण व्याप्ती त्यातून मिळणारे मूल्ये, संस्कार प्रशिक्षण पाहता मिळणारे क्रेडिट खूपच कमी आहे.

**४)संसाधनांची कमतरता-**

राष्ट्रीय सेवा योजनेसाठी आवश्यक संसाधनाची कमतरता जाणवते. राष्ट्रीय सेवा योजनेसाठी महाविद्यालयात स्वतंत्र कार्यालय, प्रिंटर, संगणक, एक स्वतंत्र लिपिक व शिपाई यांची अत्यंत आवश्यकता आहे

**५)अपुरा निधी –**

राष्ट्रीय सेवा योजनेसाठी प्राध्यापकांना पॉकेट अलाउन्स, विद्यार्थ्यांना विशेष श्रम संस्कारासाठी मिळणार निधी अत्यल्प आहे. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी एका विद्यार्थ्याला एका आठवड्यासाठी केवळ 720 रुपये मिळतात. यामध्ये आठवड्याचे दोन वेळचे जेवण, नाश्ता, चहा निवासाची सोय, वाहतूक, कार्यक्रम खर्च अशक्यप्राय आहे.

**६) सुविधांचा अभाव –**

वाहतुक, भौतिक साधने, मनुष्यबळ, ऑनलाइन रिसोर्स सुविधांचा अभाव जाणवितो. यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेची क्रियाशक्ती जास्त खर्च होते. कार्य सावकाश सुरू राहते.

**७)अधिकाऱ्यामध्ये समन्वयाचा अभाव –**

राज्य समन्वयक,विद्यापीठ समन्वयक, जिल्हा समन्वयक, महाविद्यालयीन समन्वयक यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव जाणवतो. संसाधनांची कमतरता, सुविधांचा अभाव, अपुरा निधी यामुळे अधिकाऱ्यांच्या कार्यामध्ये मंदपणा जाणवितो. अनेक कार्यक्रम सावकाश पुढे सरकत असल्याचे अनुभवास आले.

**८) पुरेसे प्रक्षिशण मिळत नाही –**

महाविद्यालयीन समन्वयकांना राष्ट्रीय सेवा योजनेबाबत पुरेसे प्रशिक्षण मिळत नाही. केवळ एकदाच सात दिवसासाठी मिळणारे प्रशिक्षण अपुरे पडते.प्राध्यापकांमध्ये नेतृत्व क्षमतेचा अभाव जाणवतो. प्राध्यापकांमध्ये श्रममूल्य व इतर मूल्ये आवश्यक प्रमाणात रुजल्याचे दिसून येत नाही.

**९) प्राध्यापक सहभाग –**

प्रवेश प्रक्रिया, पेपर सेटिंग ,पेपर चेकिंग, अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक, कनिष्ठ पर्यवेक्षक,पीएचडी मार्गदर्शक या व इतर कामकाजामुळे बरेचसे प्राध्यापक राष्ट्रीय सेवा

योजनेमध्ये इच्छा असूनही संपूर्ण सहभाग नोंदवू शकत नाहीत.

**१०) प्रशासकीय अडचणी –**

ग्रामपंचायत ,नगरपरिषद, जिल्हा परिषद, महाविद्यालय, विद्यापीठ, राज्यस्तर यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव जाणवतो. कामकाज करताना अनेक प्रशासकीय अडचणी येतात. प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शन मिळत नाही.

**११)स्थानिक लोकांच्या गरजांशी संबंधित नसलेले प्रकल्प**

राष्ट्रीय सेवा योजनेचे बरेच कार्यक्रम किंवा योजना स्थानिक लोकांच्या गरजांशी संबंधित नसतात. यामुळे विद्यार्थी ,जनता, शिक्षक यामध्ये मनापासून सहभागी होत नाहीत.

**१२)जागरुकता व संवादाचा अभाव –**

विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यामुळे जागरूकता व संवादाचा अभाव जाणवतो.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती देखील कमी आहे. यामुळे प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यात देखील संवादाचा अभाव जाणवतो.

**१३)कार्यक्रमांवर राजकीय किंवा जातीय प्रभाव पडतो.-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमांवर राजकीय किंवा जातीय प्रभाव जाणवितो. राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर ग्रामीण भागात असतात ग्रामीण भागात राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात जाणवितो. ग्रामीण भागात जातीयता अजूनही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कार्यक्रम घेण्यात मोठ्या अडचणी जाणवितात.

**१४)कागदपत्रांचा ओघ –**

राष्ट्रीय सेवा योजनेत अनेक कार्यक्रम राबविले जातात. कार्यक्रम व व विद्यापीठ वार्षिक नियोजन त्यांच्या ताळमेळ दिसून येत नाही. परीक्षेच्या काळात देखील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम सुरूच असतात.

**१५)अहवाल लेखन –**

राष्ट्रीय सेवा योजना मधील अहवाल लेखनात एक स्वरूप नाही. महाविद्यालय, विद्यापीठनिहाय त्यामध्ये फरक आढळतो. NAAC , NSS व इतर समितीसाठी देण्याचा अहवाल विद्यापीठ स्तरावर एकच असावा. प्रत्येक विद्यापीठाने त्या संदर्भात मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

**१६) लेखापरीक्षणातील अडचणी –**

राष्ट्रीय सेवा योजनेसाठी कायमस्वरूपी लिपिक नाही. महाविद्यालयातील लिपिकच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य करतो. गेल्या अनेक वर्षे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती बंद असल्यामुळे लिपिक वर्गावर कामाचा ताण जास्त आहे. यामुळे ६० टक्के पेक्षा अधिक महाविद्यालयात लेखापरीक्षणाचे कामकाज प्राध्यापकांद्वारे केले जाते. प्राध्यापकांना याचा अनुभव नसल्यामुळे लेखापरीक्षणात प्राध्यापकांचा बराच वेळ जातो.

**१७)प्रेरणा किंवा बक्षिसाचा अभाव –**

राष्ट्रीय सेवा योजना मार्फत वर्षभर महाविद्यालयनिहाय तालुकानिहाय, जिल्हानिहाय, विद्यापीठनिहाय, राज्यस्तरावर अनेक कार्यक्रम, स्पर्धा घेतले जातात. घेतलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना प्रेरणा म्हणून बक्षीसे देण्याचा अभाव दिसून येतो. प्रमाणपत्राचे वाटप देखील वेळेवर केले जात नाही. यामुळे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजने पासून दूर फेकले जातात.

**१८) निवासाच्या सोयीची कमतरता –**

विशेष श्रमसंस्कार शिबिर, राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर, प्रेरणा शिबिर, RD कॅम्प यासारखे अनेक पाच ते सात दिवसाचे कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवले जातात. विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमामध्ये निवासाच्या सोयीमध्ये कमतरता जाणविते. विशेषतः ग्रामीण भागातील शिबिरांमध्ये अत्यंत गैरसोय होते.

**१९)डीजीटल अपग्रेडेशनचा अभाव –**

राष्ट्रीय सेवा योजनेचे अजूनही डिजिटलायझेशन झालेले नाही.पारंपरिक पद्धतीने कामकाज चालते. विद्यापीठाच्या नोंदणी कागदावरच घेतल्या जातात. मीटिंग विद्यापीठात प्रत्यक्ष बोलवून घेतल्या जातात. अहवाल मागितल्यावर हार्ड कॉपीचा आग्रह केला जातो. या सर्व कारणामुळे रासेयो विभागाचे कामकाज सावकाश गतीने चालते.

**२०) अतिरिक्त गुण नाहीत-**

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये केलेल्या कार्यासंदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अतिरिक्त गुण देण्यासंदर्भात कोणताही उल्लेख नाही.अतिरिक्त केलेल्या कामकाजाचे किंवा सहभागाचे अतिरिक्त क्रेडिट मिळण्याची सोय नाही. शिववाय असलेले क्रेडिट देखील कमी आहेत.राष्ट्रीय सेवा योजनेमधील ही सर्वात मोठी मर्यादा आहे.

**२१) NSS आणि NEP मधील समन्वयाचा अभाव**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कडे केवळ एक अभ्यासपूरक उपक्रम म्हणून पाहण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मिळणारे नेतृत्वगुण, समायोजन कौशल्य,

श्रमशक्तीचा आदर, समाजकार्य या गुणांचा विचार करता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेला विशेष महत्त्व देणे गरजेचे होते. वरील सर्व मर्यादा पाहता दोनमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते.

**शिफारशी –**

1. रासेयोमध्ये विद्यार्थी , प्राध्यापक सहभाग वाढविण्यात यावा.
2. रासेयोस स्वतंत्र विषय व अनिवार्य विषय म्हणून मान्यता देण्यात यावी.
3. रासेयो योजनेचे क्रेडीट वाढविण्यात यावे.प्रथम वर्षासाठी चार व द्वितीय वर्षांसाठी चार क्रेडीट देण्यात यावेत.
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेसाठी खास स्वतंत्र व राखीव निधीची सोय करण्यात यावी.
5. राष्ट्रीय सेवा योजनेसाठी आवश्यक मनुष्यबळ व संसाधने पुरविण्यात यावीत.
6. राष्ट्रीय सेवा योजनेतील अधिकाऱ्यांना सखोल प्रक्षिशण द्यावे.अधिकाऱ्यांमध्ये योग्य समन्वय ठेवण्यात यावा. प्रशिक्षणांचे दिवस वाढविण्यात यावे.
7. रासेयो मध्ये स्थानिक लोकांच्या गरजांशी संबंधित असलेले प्रकल्प राबविण्यात यावेत.जनतेशी संवाद वाढविण्यात यावा.
8. रासेयो कार्यक्रमांवरील राजकीय किंवा जातीय प्रभाव कमी करावा.
9. विद्यार्थी व प्रध्यापाकांना शिबिरांसाठी उत्तम निवासाची सोय करण्यात यावी.
10. विद्यार्थ्यांसाठी सहभाग वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात बक्षिसे, प्रमाणपत्रे देण्यात यावीत.
11. रासेयो व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांच्या मध्ये समन्वय साधला जावा. राष्ट्रीय सेवा योजनेचे डीजीटल अपग्रेडेशन करण्यात यावे.

**संदर्भ -**


1. Patel, R., & Deshmukh, S. (2022). "NEP 2020 Implementation Challenges in Rural India", Journal of Educational Policy, 15(2), 45-62.
2. Sharma, A. (2021). "Multilingual Education under NEP 2020: Barriers and Solutions", Indian Educational Review, 28(3), 112-130.
3. Kumar, V., & Joshi, M. (2023). "Digital Divide and NEP 2020", Technology in Education Journal, 12(1), 78-95.
4. Sinha, D. (2022). NEP 2020: Roadblocks and Remedies. Oxford University Press.
5. Mehta, P. (2021). Implementing Education Reforms: The Indian Context. Routledge.
6. Nair, R., & Reddy, K. (2023). NEP 2020: Teacher Training Challenges. Sage Publications.
7. Sharma, R. K. (2018). Youth and Community Service: The NSS Framework. New Delhi: Sage Publications.
8. Patel, M., & Desai, S. (2020). Social Empowerment through NSS: Case Studies from Rural India. Oxford University Press.
9. Kumar, A. (2017). National Service Scheme: History, Challenges and Future Directions. Academic Foundation.
10. Joshi, P. (2021). "Effectiveness of NSS in Developing Leadership Skills among College Students", Indian Journal of Social Work, 82(2), 145-160.